४७१

**प्रमुख खनिजांच्या खाणपट्टा करारनाम्यासाठी अपेक्षित स्वामित्वधनाच्या आधारे मुद्रांक शुल्क आकारणी.**

# महाराष्ट्र शासन

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग
शासन परिपत्रक क्र. एमएनजी-०४११ / प्र.क्र. २७ / उद्योग-९
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक --

वाचा- शासन परिपत्रक क्र. एमएनजी -१०८०/१२६८६२ /( २८१२ ) / उद्योग-९ दि. ५ सप्टेंबर , १९९२

**प्रस्तावाना-** प्रमुख खनिजाचे खनिपट्टा करारनामा निष्पादित करतेवेळी वरील परिपत्रकानुसार मृतभाटकाच्या दराआधारे अपेक्षित स्वामित्वधनाची परिगणना करुन मुद्रांक शुल्क रक्कम ठरविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ मधील कलम २७ मधील तरतूदी तसेच वरील परिगणना ठरविण्यात आली त्यावेळीचे स्वामित्वधनाचे दर ठरविण्याची पध्दती मध्ये अमूलाग्र बदल झाला आहे. सन २००९ पासून स्वामित्वधनाचे दर खनिजांच्या बाजारभावाशी निगडीत केल्यामुळे या परिपत्रकातील सूचनांचे पुनर्विलोकन करुन मुद्रांक शुल्क आकारणी अधिक शास्त्रशुध्द पध्दतीने करण्यासाठी पूर्वीच्या पध्दतीत बदल करुन सुधारित पध्दती अवलंबिण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## परिपत्रक

मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ कलम २७ अंतर्गतच्या दुस-या परंतुका नुसार खनिजाच्या खाणपट्टाकराराचे निष्पादन करतांना मुद्रांक शुल्क ठरविण्यासाठी अपेक्षित स्वामित्वधनाची रक्कम निश्चित करण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकारी ( मुद्रांक शुल्क ) यांना आहे. प्रमुख खनिजाच्या खाणपट्टा निष्पादनाचे वेळी मुद्रांक शुल्क निश्चितीसाठी स्वामित्वधनाची परिगणना पुढील प्रमाणे करून त्यावरून मुद्रांक शुल्काची रक्कम निश्चित करावी.

" संबंधित खाणप्रकल्पासाठी सक्षम प्राधिका-याने मान्यता दिलेल्या खाणकाम कार्यक्रम योजनेनुसार उत्खनन योग्य ( Minable ) खनिज साठ्यासाठी निष्पादनाचे वेळी संबंधित खनिजाचा स्वामित्वधनाच्या दरानुसार येणारी रक्कम हे एकूण अपेक्षित स्वामित्वधन असेल त्या रकमेच्या ३ टक्के ( तीन टक्के ) एवढे मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात यावे "

सुत्र स्वरूपात –

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Minable reserves as per Mining Plan | X | Prevailing Rate of Royalty on the Date of execution | = | Total Anticipated Royalty |

Stamp Duty will be charged @ 3 % of Total Anticipated Royalty

उदा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1,00,000 टन साठा | X | रु.90 प्रतिटन | = | रु.90,00,000 /- अपेक्षित स्वामित्वधन |

मुद्रांक शुल्क = 90,00,000 X 3 / 100 = 2,70,000 /-

सदर परिपत्रक वित्त विभागाच्या अनैपचारिक संदर्भ क्र.--------------------------- दि. -----अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

या परिपत्रकान्वये शासन परिपत्रक क्रमांक एमएनजी -१०८०/१२६८६२ /( २८१२ ) / उद्योग- ९ दि. ५ सप्टेंबर , १९९२ निरसित करण्यात येत आहे. तसेच हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अमंलात येईल.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक -------------------------------- असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

( व.शं.कुलकर्णी )
शासनाचे उप सचिव

प्रति,

संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक पुणे / मुद्रांक अधिक्षक , मुंबई
सर्व विभागिय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
सर्व सह जिल्हा निबंधक ( नोंदणी व मुद्रांक विभाग )
महालेखाकार, महाराष्ट्र राज्य – १ मुंबई
महालेखाकार, महाराष्ट्र राज्य – २ नागपूर
वित्त विभाग ( व्यय १६ ) , मंत्रालय, मुंबई
महसूल व वन विभाग ( म-१ ), मंत्रालय, मुंबई
विधी व न्याय विभाग ( ए ), मंत्रालय, मुंबई